PRAJAWANI 15.06.26

# गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूलचा २३वा स्थापनादिन उत्साहात

प्रतिनिधी • नांदेड



गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूलचा २३ वा स्थापना दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गेल्या २३ वर्षांपासून शैक्षणिक गुणवत्ता, संस्कारमूल्ये आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या या संस्थेने शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

संस्थापक संचालिका व प्राचार्या सौ. वैशाली कुलकर्णी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली शाळेने सातत्याने प्रगती साधली आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच नैतिक मूल्यांचे संस्कार देण्यावर संस्थेचा विशेष भर राहिला आहे. शाळेने एसएससी परीक्षेत १०० टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी नोंदवून आपल्या यशाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे ही उल्लेखनीय कामगिरी शक्य झाल्याचे मानले जात आहे.

स्थापना दिनानिमित्त बोलताना सौ. वैशाली कुलकर्णी यांनी शिक्षक, विद्यार्थी, पालक व हितचिंतकांचे आभार व्यक्त केले. भविष्यातही विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षण व संस्कार देत जबाबदार आणि समाजोपयोगी नागरिक घडविण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी शाळेच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेण्यात आला. तसेच आगामी काळातही शैक्षणिक उत्कृष्टतेचा वारसा कायम राखत प्रगतीची नवी शिखरे गाठण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूलच्या २३ वर्षांच्या यशस्वी प्रवासाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.